कृषि अवशेषांपासून ब्रिकेट/पेलेट/ कांडी कोळसा संयंत्र उभारण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
पूरकपत्र क्र. अपाऊ-२००७/प्र.क्र.५९०/ऊर्जा-७
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २७ फेब्रुवारी,२००९

वाचा: शासन निर्णय क्रमांक अपाऊ-२००७/प्र.क्र.५९०/ऊर्जा-७,
दि. ११ सप्टेंबर, २००७

**पूरकपत्र :** वरील संदर्भांकित दि. ११ सप्टेंबर, २००७ च्या शासन निर्णयानुसार कृषि अवशेषांपासून ब्रिकेट/पेलेट/ कांडी कोळसा संयंत्र उभारण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर मान्यता देताना लाभार्थींची निवड व योजनेच्या अंमलबजावणीच्या पध्दतीबाबतच्या निकषांचा त्यात समावेश आहे.लाभार्थींची निवड व अंमलबजावणीबाबतच्या पध्दतीमध्ये आणखी खालील अतिरिक्त निकषांचा समावेश करण्यात येत आहे.

(अ) **लाभार्थ्यांची निवड :** प्रकल्पासाठी लाभार्थींनी बँकेकडून अथवा वित्तीय संस्थाकडून कर्ज घेतलेले आहे असे प्रकल्पच या योजनेअंतर्गत आर्थिक सहाय्याकरिता पात्र ठरतील.

(ब) १) **अंमलबजावणीची पध्दत** : ज्या प्रकल्पधारकांनी बँक / वित्तीय संस्था यांच्याकडून कर्ज घेतले असेल त्या प्रवर्तकांनाच या योजनेमध्ये अनुदान उपलब्ध होवू शकेल आणि अनुदानाची रक्कम संबंधित बँक / वित्तीय संस्थास महाऊर्जाकडून थेट अदा केली जाईल. याकरिता आवश्यक ते तांत्रिक / लेखापरिक्षण व मान्यता देण्याची प्रक्रिया संबंधित बँकानी करणे आवश्यक राहिल.

२) अनुदानाचा वापर करणा-या लाभधारकांचे संयंत्र नवीन असले पाहिजे. ( सदरचे संयंत्र वित्त वर्ष २००७-०८ किंवा सन २००८-०९ मध्ये कार्यान्वित केलेले असावे.)

३) लाभार्थींच्या प्रस्तावास महाऊर्जाकडून इरादापत्र दिले जाणार नाही. तथापि, प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य या पध्दतीने प्रवर्तकांचे प्रकल्प आस्थापित करण्यात येवून कार्यान्वित होणे आवश्यक आहे. लाभार्थ्याने / प्रवर्तकाने सर्व आवश्यक ते कागदपत्र महाऊर्जा कार्यालयास उपलब्ध करुन दिल्यानंतर उपलब्ध अनुदानाचे वाटप करण्यात येईल. सदरची योजना वित्त वर्ष सन २००८ -०९ मधील प्राप्त प्रस्तावासाठी लागू राहिल. वित्त वर्ष २००८-०९ पासून ज्या प्रवर्तकांनी बँक / वित्तीय संस्था यांच्याकडून कर्ज घेतले असेल त्या प्रवर्तकांच्या प्रकल्पासाठीच सदर अनुदान योजना लागू करण्यात येईल.

४) वित्त वर्ष सन २००७-०८ मध्ये नियोजित अनुदानाचा निधी पूर्णपणे खर्च होण्याच्यादृष्टीने ज्या प्रकल्पांना इरादापत्र देण्यात आलेले आहे, मात्र परिपूर्ण प्रस्ताव महाऊर्जा कार्यालयास वेळेवर सादर केलेला नसल्यामुळे ज्यांना निधी उपलब्ध होवू शकला नाही अशा सर्व लाभार्थींसाठी ही योजना वित्त वर्ष २००८-०९ करीता लागू करण्यात आली आहे. या लाभार्थी पैकी काही लाभार्थींनी पूर्णपणे



MEDA-PUNE
7 MAR 2009
No. 2009 2753

स्वनिधीमधून ( बँकाकडून अथवा वित्तीय संस्थांकडून कर्ज न घेता ) कांडी कोळसा यंत्रसामुग्री विकत घेतली असेल ,त्या लाभार्थीना निधीचे वाटप त्यांच्या नावाने त्यांच्या बँक खात्यावर देण्यात येईल.

लाभार्थीची निवड व अंमलबजावणीबाबतच्या निकषांव्यतिरिक्त दि. ११ सप्टेंबर, २००७ च्या शासन निर्णयात नमूद केलेल्या अन्य सर्व बाबी व निकष हे तसेच रहातील.

( सु.दि. पारधी )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

- महासंचालक,महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण ,पुणे
- सर्व जिल्हाधिकारी
- सर्व मु.का.अ., जिल्हा परिषद
- सर्व विभागीय आयुक्त
- महालेखापाल म.रा.मुंबई / नागपूर
- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, सुत्रधार कंपनी मर्या., मुंबई.
- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., मुंबई.
- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्या., मुंबई.
- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या., मुंबई.
- खाजगी सचिव, मा.मंत्री, (ऊर्जा)
- खाजगी सचिव, मा.मंत्री, (अपारंपरिक ऊर्जा)
- खाजगी सचिव, सर्व मा. मंत्री व सर्व मा. राज्यमंत्री
- सर्व मंत्रालयीन विभाग
- ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने
- निवडनस्ती